# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

( डिजीटाईज्ड कालबध्द सेवा २०१६ )

क्रमांक : २/एनजीसी/न्यु.फार्म/मान्यता/२०१६/९३०
दिनांक : 20 JUL 2016

प्रति,
प्राचार्य,
संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे,
अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी.फार्मसी,
मु.पो.आष्टा, ता.वाळवा,
जि.सांगली ४१६ ३०१

(डीटीई कोड ६८९३)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१६/१-२८५८००९९४१ दि. ३०.०४.२०१६.
२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.-२७०/तांशि-४, दि. ०७ जुलै, २०१६.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्मसी | ५० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडूनपरवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षक कर्मचारी नेमावेत व शासन व अखिल भारतीय

तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावेत. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यांत येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र या पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून **प्रथम वर्षासाठी रु.१२.०० लाख आयडीबीआय बँक लि., शाखा – आष्टा, ता.वाळवा** येथे पावती **क्र.८११८१११४,** दि. १५.०७.२०१६ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच **द्वितीय वर्षासाठी रु.१०.५० लाख संयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवीची मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे.**

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाची फी निर्धारित करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७ नुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७ नुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७ नुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन किंवा **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश पक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१३. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१४. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१५. शासनाने, या संचालनालयाने **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था

उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

१६. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७ नुसार शुल्क नियामक प्राधिकरण **यांनी** निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.

२. मा. **कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.

४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.

५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.

६. निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- २/एनजीसी/फार्मसी/मान्यता/२०१७/६८७३

दिनांक:- 9 JUN 2017

प्रति,

प्राचार्य,

संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थांचे,

अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी - फार्मसी,

अष्टा, ता. वाळवा, जि. सांगली.

**डिटीई कोड - ६८९३**

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या क्षमतेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ :- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. वेस्टर्न/१-३३२३६४५३८४ /२०१७/ईओए, दि. १० एप्रिल, २०१७.

२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२१५/तांशि-४, दि.१५ मे, २०१७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्मसी | ५०-१०० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास नियतठेव म्हणून रु ०१.५० खाते क्र. ०४८११०७००००१३०९५ दि. २६.०५.२०१७, अन्वये आयडीबीआय बँक, शाखा- अष्टा, ता. वाळवा येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर केली आहे.

संदर्भाकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे संस्थेमध्ये पदवी

अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास व संबंधीत विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहीत पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / वास्तुकला परिषद नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त तसेच संदर्भीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- १. मा.अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.

२. मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.

४. कार्यासन क्र. २ -अ , मुख्य कार्यालय, मुंबई.

५. कार्यासन क्र. ३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.

६. निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597465/475/492/442/443/447
ई-मेल—desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:https://www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश क्र. २/एनजीसी/मान्यता/पीसीआय/२०२४-२५/भाग १/ १०१८ . दिनांक: 31 DEC 2024

विषय : फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढीस मान्यता देण्याबाबत......

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने सोबतच्या विवरणपत्रात नमूद शासन निर्णयान्वये नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम ,सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या संचालनालयाच्या अधिपत्याखाली येणा-या सोबतच्या विवरणपत्रा मधील संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्धारीत संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. संस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे सोबतच्या विवरणपत्रात अंतर्भूत संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी ई मेल द्वारे अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सेलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, संबंधित विद्यापीठे (संबंधित संस्थेमार्फत)
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे
४. संबंधित संस्था
५. कार्यासन क्र.२,१० व ३ मुख्य कार्यालय, मुंबई
६. निवड नस्तीस.

F:\BUDAGE\2024-25\Approval Process\Final Order\PCI\Lot 1.docx

| Sr. No. | Institute Code | PCI Code | Name of the Institute | Institution Type | University | Level | Program | Name of Course | Intake Approved for 2023-24 | Intake Approved for 2024-25 | Approval For | Government Resolution No & Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 69 | 6616 | PCI - 1890 | Sant Gajanan Maharaj College of Pharmacy Mahagaon, Site, Chinchewadi, Tal. Gadhingalaj, Dist. Kolhapur - 416 503 | Un-Aided | Shivaji University, Kolhapur | POST GRADUATE | Pharm.D | Pharm.D | 0 | 30 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.377/तांशि-4,दिनांक 3.10.2024 |
| 70 | 6829 | PCI-2652 | Womens College of Pharmacy, Peth, Vadgaon, Tal.Hatkanangle, Dist. Kolhapue - 416 112 | Un-Aided | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 6 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.377/तांशि-4,दिनांक 03.10.2024 |
| 71 | 6893 | PCI-2860 | Annasaheb Dange College of B Pharmacy, Ashta, Tal. Walwa, Dist Sangli, Ashta - 416 301 | Un-Aided | Shivaji University Kolhapur | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 15 | New Course | शासन निर्णय क्रमांक मान्यता 2024/प्र.क्र.365/तांशि-4, दि. 30.9.2024 |
| | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | New Course | शासन निर्णय क्रमांक मान्यता 2024/प्र.क्र.365/तांशि-4, दि. 30.9.2024 |
| 72 | 6908 | PCI-144 | Ashokrao Mane Institute of Pharmaceutical Sciences and Research, Save A P Save, Tal. Shahuwadi, Dist. Kolhapur, Save - 416213 | Un-Aided | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 15 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.391/तांशि-4,दिनांक 10.10.2024 |
| 73 | 6923 | PCI-2987 | Padmini College of Pharmacy, Dighanchi 415315 | Un-Aided | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M.Pharmacy | Pharmaceutical Chemistry | 0 | 15 | New Course | शासन निर्णय क्रमांक मान्यता 2024/प्र.क्र.380/तांशि-4, दि.10.10.2024 |
| 74 | 6930 | PCI-3099 | Delonix Societys Baramati College of Pharmacy, Baramati, Barhanpur 413 102 | Un-Aided | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | 0 | 15 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.359/तांशि-4,दिनांक 30.09.2024 |
| | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Chemistry | 0 | 15 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.359/तांशि-4,दिनांक 30.09.2024 |
| | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | 0 | 15 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.359/तांशि-4,दिनांक 30.09.2024 |
| | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | 0 | 15 | New Course | उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-2024/प्र.क्र.359/तांशि-4,दिनांक 30.09.2024 |

(Dr.Vinod Mohitkar)
Director,Technical Education.M.S.Mumbai 1

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk.10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/मान्यता/2018/ ८५८
दिनांक : 23 JUL 2018

प्रति,
प्राचार्य,
संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे,
अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी फार्मसी,
पो. अष्टा, ता. वाळवा,
जि. सांगली-416301.

**(डीटीई कोड : 6893)**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...**

**संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्रमांक : वेस्टर्न/१-३५०८३४६४९०/२०१८/ईओए, दिनांक : १०.४.२०१८.**
**२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०१८/(प्र.क्र.१३९/१८) तांशि-५, दिनांक : ८.६.२०१८.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | डिप्लोमा इन फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ३.०० लाख खाते क्रमांक ०४८११०७००००१३२७१, दि. ११.६.२०१८ अन्वये, आयडीबीआय बँक, शाखा- आष्टा, येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. शासनाने, संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.
४. सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.
१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
५. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.